लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकांच्या कामासाठी नियुक्त केलेल्या विभागीय, जिल्हा व तहसिल पातळीवरील निवडणूक शाखेच्या अराजपत्रित कर्मचाऱ्यांनी केलेल्या जादा कामासाठी अतिकालिक भत्ता देणेबाबत -

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक - सीईएल - २०१९/प्र.क्र.५७९/१९/३३(२)

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक- ३१ मे, २०१९.

शासन निर्णय -

महाराष्ट्र राज्यात दिनांक ११, १८, २३ व २९ एप्रिल २०१९ अशा चार टप्प्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या आहेत. दिनांक १० मार्च २०१९ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केल्यापासून ते दिनांक २७ मे २०१९ ह्या निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूका संबंधीचे काम ठराविक मुदतीत पार पाडण्यासाठी मंत्रालयीन, विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवरील निवडणूक शाखांमध्ये काम करणाऱ्या वर्गाला सुट्टीच्या दिवसांसह प्रत्येक दिवशी जादा काम करावे लागले. त्याकरिता सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्तांची कार्यालये तसेच सर्व जिल्हाधिकाऱ्यांची निवडणूक कार्यालये, तहसिल कार्यालये यामध्ये निवडणूकांचे काम करणाऱ्या, अराजपत्रित कर्मचारी वर्गाला तसेच मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयात व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयात, इतर विभागातून/ जिल्हा आस्थापनेतून निवडणूकीच्या कामासाठी घेतलेल्या अतिरिक्त अराजपत्रित कर्मचारी वर्गाला निम्ननिर्देशित शर्तीच्या अधीन राहून, खालील प्रमाणकानुसार अतिकालिक भत्ता देण्यास मंजूर देण्यात येत आहे.

(१) अतिकालिक भत्याचा दर -

कोणत्याही कामाच्या दिवशी केलेल्या जादा कामाच्या प्रत्येक पूर्ण तासाला (अर्धा तास किंवा अर्ध्या तासांपेक्षा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरण्यात येईल) प्रत्येक तासाच्या मूळ वेतन (Basic Pay) च्या प्रमाणात देण्यात येईल.

टिप - दर ताशी वेतनाचा दर ठरविण्यासाठी महिना ३० दिवसांचा आणि गट “ब” (अराजपत्रित) व गट “क” कर्मचाऱ्यांसाठी दिवस ७ तासांचा समजण्यात येईल तर चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गाचे दैनंदिन कामाचे तास बृहन्मुंबईत ८ तास व इतर ठिकाणी ९ तास समजण्यात येतील

(२) अटी व शर्ती -

(१) अतिकालिक भत्ता माहे एप्रिल २०१९ च्या ७ व्या वेतन आयोगानुसार देय मूळ वेतन (Basic Pay) च्या प्रमाणात तासाच्या दराने दिला जाईल. तसेच दैनंदिन वेतनाचा दर काढताना, त्यामध्ये इतर कुठल्याही भत्याचा (उदा. घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता इत्यादी) समावेश होणार नाही.

(२) सर्वसाधारण कार्यालयीन वेळेपेक्षा जास्त काम केलेल्या कामासाठी अतिकालिक भत्ता अनुज्ञेय असेल आणि तो फक्त दिनांक १० मार्च २०१९ ते दिनांक २७ मे २०१९ (दोन्ही दिवस धरून) या कालावधीसाठी देय राहील.

(३) उपरोक्त कालावधीतील सुट्टीच्या दिवशी केलेल्या निवडणूकीसंबंधीच्या कोणत्याही कामासाठी अतिकालिक भत्ता दिला जाईल.

(४) मंत्रालय, विभागीय, जिल्हा व तहसिल पातळीवर निवडणूकीसाठी नेमण्यात आलेल्या इतर संस्थांतील कर्मचाऱ्यांना वरील पध्दतीने अतिकालिक भत्ता देय राहील.

(५) अतिकालिक भत्याची कमाल मर्यादा त्यांच्या माहे एप्रिल २०१९ च्या सातव्या वेतन आयोगानुसार देय होणाऱ्या मूळ वेतना (Basic Pay) एवढी राहील. त्यामध्ये इतर कुठल्याही भत्याचा (उदा. घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता इत्यादि) समावेश होणार नाही.

(६) जे कर्मचारी निवडणूकीच्या कामासाठी मुख्यालयाबाहेर प्रवास करतील त्यांना नियमानुसार मिळणाऱ्या प्रवास / दैनिक भत्याव्यतिरिक्त अतिकालिक भत्ता देय नाही. या दोन्ही भत्यांपैकी जो फायदेशीर असेल तो भत्ता घेण्याबाबत सदर कर्मचाऱ्यांना पर्याय राहील.

(७) निवडणूकीचे काम ज्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पार पाडले जाते ते अधिकारी, अतिकालिक भत्यासाठी कर्मचारी वर्गाने केलेल्या जादा कामाचा दैनंदिन कालावधी दैनंदिन हजेरीपटाच्या आधारे प्रमाणित करतील.

(८) निवडणूकीच्या कामासाठी दैनंदिन वेतनावर नेमलेल्या कर्मचारी वर्गाला अतिकालिक भत्ता देय नाही.

२. या बाबींवर होणारा खर्च मागणी क्रमांक ए-२, प्रधानशीर्ष २०१५-निवडणूका, उपशीर्ष १०५-संसदेच्या निवडणूक घेण्यासाठी लागणारा खर्च, (००)(०१) संसदेच्या निवडणूक घेण्यासाठी लागणारा खर्च, १३-कार्यालयीन खर्च (२०१५००५९) दत्तमत या लेखाशीर्षाखालील सन २०१९-२० या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी या शासन निर्णयाच्या आधारे मानधनाची / अतिकालिक भत्याची परिगणना करुन अनुदानाची स्वतंत्रपणे मागणी करावी.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक: अनौसं-११७/१९/सेवा-६/९, दिनांक २७.०५.२०१९ व अनौपचारीक संदर्भ क्रमांक: अनौसं-१६४/२०१९/व्यय-४, दिनांक ३१.०५.२०१९ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६०११०३२४३२५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL NANSING VALVI

Digitally signed by ANIL NANSING VALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=1a7c28200f6d58206324d8086ffcf99758c115aada508a7437f2ae5d9fa1ba5d, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=328a78fb26991ef7b9493ea647f585c65b1cf01913ae44b41ffee5cc8464f2f1, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ANIL NANSING VALVI
Date: 2019.06.01 12:56:45 +05'30'

(अ.ना.वळवी)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी
महाराष्ट्र राज्य

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा), नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / वांद्रे
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी
५. सर्व विभागीय आयुक्त

६. सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
८. सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी
९. सर्व लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी
१०. जिल्हयांचे उप जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे मार्फत)
११. वित्त विभाग व्यय-४, मंत्रालय, मुंबई
१२. सामान्य प्रशासन विभाग/ का.क्र.१९, २६, मंत्रालय, मुंबई
१३. निवड नस्ती (कार्यासन - ३३).